# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : २४ एप्रिल २०१८

## ( बैठक क्र. १७४)

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १. | छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत २००१ ते २००९ मधील थकित खातेदारांचा समावेश | सहकार |
| २. | बृहन्मुंबईतील शासकीय जमिनींवरील भाडेपट्ट्यांच्या नूतनीकरण धोरणात सुधारणा | महसूल |
| ३. | रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या जालना येथील मराठवाडा उपकेंद्रासाठी ३९७ कोटींचा निधी | उच्च व तंत्रशिक्षण |
| ४. | फाळणीनंतर राज्यात आलेले निर्वासित शासनाकडून दिलेल्या जमिनी फ्रि-होल्ड करण्याचा निर्णय | महसूल |
| ५. | राज्य कामगार विमा सोसायटी स्थापन करणार | सार्वजनिक आरोग्य |
| ६. | वन विभागातील रोजंदारीवरील ५६९ मजुरांना नियमित करणार | वने |
| ७. | बिरसा मुंडा आदिवासी सूतगिरणीची शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड | वस्त्रोद्योग |

## छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत २००१ ते २००९ मधील थकित खातेदारांचा समावेश

राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने जाहीर केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेचा लाभ आता २००१ ते २००९ या कालावधीतील कर्ज थकित असलेल्या, परंतु २००८ व २००९ च्या कर्जमाफी योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकरी खातेदारांनाही देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. तसेच इमूपालन, शेडनेट, पॉलिहाऊस यासाठी २००१ ते २०१६ या कालावधित घेतलेल्या मात्र थकित राहिलेल्या कर्जाचाही समावेश या योजनेत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मंत्रिमंडळाच्या आजच्या निर्णयानुसार १ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २००९ पर्यंत उचल केलेल्या पीक किंवा मध्यम मुदत कर्जाची ३० जून २०१६ रोजी थकित झालेल्या रकमेतून परतफेड केलेली रक्कम वगळून ३१ जुलै २०१७ पर्यंतच्या मुद्दल व व्याजासह एकूण दीड लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्यात येणार आहे. तसेच इमूपालन, शेडनेट, पॉलीहाऊस यासाठी मध्यम मुदत कर्ज घेतलेल्या थकित शेतकऱ्यांनाही छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतून दिलासा देण्याचा महत्त्वाचा निर्णय आज मंत्रिमंडळाने घेतला. त्यानुसार १ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २०१६ पर्यंत इमूपालन, शेडनेट, पॉलीहाऊस यासाठी मध्यम मुदत कर्ज घेतलेल्या आणि अशा कर्जापैकी ३० जून २०१६ रोजी थकीत झालेल्या रकमेतून परतफेड केलेली रक्कम वगळून ३१ जुलै २०१७ पर्यंतची मुद्दल व व्याजाची थकित रक्कम दीड लाखाच्या मर्यादेत माफ करण्यात येणार आहे. या थकबाकीदार शेतकऱ्यांचे अल्प किंवा अत्यल्प भूधारक याप्रकारे जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या पूर्वीच्या निकषाप्रमाणे सरसकट कर्जमाफी देण्यात येईल.

त्याचप्रमाणे १ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २००९ पर्यंत वाटप केलेल्या पीक कर्जापैकी ३० जून २०१६ पूर्वी किंवा नंतर पुनर्गठित किंवा फेरपुनर्गठित झालेल्या कर्जाचे ३१ जुलै २०१७ पर्यंत थकित व उर्वरित हप्ते दीड लाखाच्या मर्यादेपर्यंत असल्यास त्याचा कर्जमाफी योजनेत समावेश करण्यात येणार आहे. पीक कर्जाच्या पुनर्गठन किंवा फेरपुनर्गठनाची थकित रक्कम दीड लाख रुपयांपेक्षा अधिक असल्यास एकरकमी परतफेड योजनेनुसार शेतकऱ्यांनी दीड लाखावरील थकीत रक्कम ३० जून २०१८ पर्यंत भरल्यास त्यांना दीड लाख रकमेच्या मर्यादेपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार आहे.

आजच्या निर्णयांची अंमलबजावणी करताना २००८ ते २००९ मध्ये अनुक्रमे केंद्र व राज्य शासनाने राबविलेल्या कर्जमाफी योजनांचा फायदा मिळाला नसल्याबाबत शेतकरी व बँकांकडून घोषणापत्र घेणे बंधनकारक करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेचे लाभ २८ जून २०१७ आणि त्यानंतर वेळोवेळी काढण्यात आलेल्या शासन निर्णयांमधील अटी, शर्ती व निकषांच्या अधीन राहून देण्यात येतील.

-----०-----

महसूल विभाग

## बृहन्मुंबईतील शासकीय जमिनींवरील भाडेपट्ट्यांच्या नूतनीकरण धोरणात सुधारणा

बृहन्मुंबईतील शासकीय जमिनींवरील भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण करण्याच्या धोरणात सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या सुधारणेमुळे संबंधित भाडेपट्टाधारकांना दिलासा मिळणार असून भाडेपट्ट्यांच्या नूतनीकरणामुळे शासनाच्या महसुलातही वाढ होणार आहे.

बृहन्मुंबई (मुंबई शहर आणि उपनगर) मधील शासकीय जमिनींच्या भाडेपट्ट्यांच्या नूतनीकरणाबाबत १२ डिसेंबर २०१२ नुसार धोरण ठरविण्यात आले आहे. त्यानुसार भाडेपट्ट्यावरील जमिनींचे मूल्य ठरविताना वार्षिक मूल्य दर तक्त्याचा (रेडी रेकनर) वापर करण्यात येतो. भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनीच्या प्रचलित रेडी रेकनरनुसार येणाऱ्या किंमतीच्या २५ टक्के रकमेवर निवासी प्रयोजनासाठी २ टक्के, औद्योगिक प्रयोजनासाठी ४ टक्के, वाणिज्यिक प्रयोजनासाठी ५ टक्के, निवासी व वाणिज्यिक या मिश्र प्रयोजनासाठी ५ टक्के या दराने भाडेपट्ट्याची आकारणी करण्यात येते. जमिनींच्या किंमती दिवसेंदिवस वाढत असल्याने भूईभाड्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मात्र, त्याप्रमाणात भाडेपट्टाधारकांच्या उत्पन्नात वाढ झालेली नाही. त्यामुळे भुईभाडे कमी करण्याची होणारी मागणी लक्षात घेऊन भाडेपट्ट्यांच्या दरामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

मंत्रिमंडळाच्या आजच्या निर्णयानुसार मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यात व्यक्तिगत निवासी वापरासाठी भाडेपट्ट्याने दिलेल्या ५०० चौरस मीटर किंवा त्यापेक्षा कमी क्षेत्रफळाच्या शासकीय भूखंडाच्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करताना रेडी रेकनरप्रमाणे जमिनीच्या किंमतीच्या २५ टक्के रकमेवर १ टक्के इतके वार्षिक भूईभाडे आकारणी करण्यात येईल. सहकारी गृहनिर्माण संस्थांना निवासी वापरासाठी दिलेल्या शासकीय भूखंडांच्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करताना १ टक्के इतके वार्षिक भूईभाडे आकारणी करण्यात येईल. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, अनाथालये, धर्मशाळा या कारणांसाठी भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींसाठी ०.५ टक्के इतके वार्षिक भूईभाडे आकारण्यात येईल. भुईभाड्यात देण्यात आलेली ही सवलत या भूखंडांवरील इमारतींच्या पुनर्विकासानंतर लागू होणार नाही. पुनर्विकासानंतर त्यावेळच्या प्रचलित धोरणाप्रमाणे भुईभाडे आकारले जाईल. इमारतींची देखभाल किंवा दुरुस्ती अथवा जीर्णोद्धार म्हणजे पुनर्विकास असणार नाही.

-----०-----

## रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या जालना येथील मराठवाडा उपकेंद्रासाठी ३९७ कोटींचा निधी

मुंबईच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेचे जालना जिल्ह्यात मराठवाडा उपकेंद्र स्थापन करण्यासाठी लागणाऱ्या ६९ कोटी ३९६लाख रुपयांच्या खर्चासह १२१ शिक्षकीय व १५८ शिक्षकेतर पदे निर्माण करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

देशातील अग्रगण्य शिक्षण संस्था असलेल्या रसायन तंत्रज्ञान संस्थेने मागील ८१ वर्षांत संशोधन व नाविण्यपूर्ण कार्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे. या संस्थेत ६८७ पूर्णवेळ पीएचडी संशोधक आणि ३८० मास्टर्स विद्यार्थी संशोधन करीत आहेत. येथील संशोधकांनी अनेक पेटंट घेतली असून या संस्थेत विकसित करण्यात आलेले तंत्रज्ञान औद्योगिक क्षेत्रात उपयुक्त ठरत आहे. त्यामुळेच या संस्थेला महाराष्ट्र सरकारने आयआयटी, आयआयएससी आणि आयआयएसईआर यांच्याप्रमाणे विशेष दर्जा आणि उत्कृष्ट केंद्र म्हणून मान्यता दिली आहे. मराठवाडा क्षेत्रातील नागरी जीवनावर प्रत्यक्ष परिणाम करु शकणाऱ्या सुमारे ३० -सेंटर ऑफ एक्सलन्स॰ स्थापन करून संबंधित क्षेत्रात उच्च दर्जाचे संशोधन करण्याचा संस्थेचा मानस आहे. सुरुवातीस प्रत्येकी ३० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे सहा पदवी अभ्यासक्रम, १६ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम, विविध क्षेत्रातील नऊ पीएचडी अभ्यासक्रमासह केमिकल टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट या क्षेत्रातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.

रसायन तंत्रज्ञान संस्थेला मराठवाडा उपकेंद्र उभारण्यासाठी जालना जिल्ह्यातील शिरसवाडी येथील २०० एकर शासकीय जमीन भाडेपट्ट्यावर देण्याचा निर्णय औरंगाबाद येथील मंत्रिमंडळाच्या विशेष बैठकीत घेण्यात आला होता. त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आली असून या ठिकाणी मराठवाडा उपकेंद्राच्या बांधकाम व यंत्रसामग्रीसाठी लागणाऱ्या २०२ कोटी ९० लाख रुपयांच्या निधीमधील १०० कोटी रुपये राज्य शासनातर्फे टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मात्र, उर्वरित निधी रसायन तंत्रज्ञान संस्थेला उभारावा लागणार आहे. तसेच या उपकेंद्रासाठी प्रस्तावित केलेले अभ्यासक्रम राबविण्यासाठी आवश्यक असलेली १२१ शिक्षकीय आणि १५८ शिक्षकेतर पदे निर्माण करण्यास उच्चस्तर समितीच्या छाननी व मान्यतेच्या अधीन राहून तत्वत: मान्यता देण्यात आली. त्यासाठी लागणाऱ्या ४० कोटी रुपयांच्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली असून हा निधी राज्य शासनामार्फत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. निधीची उपलब्धता व कामाची प्रगती यानुसार आर्थिक वर्ष २०१८-१९ पासून टप्प्याटप्प्याने निधी दिला जाणार आहे.

-----o-----

फाळणीनंतर राज्यात आलेले निर्वासित

## शासनाकडून दिलेल्या जमिनी
## फ्रि-होल्ड करण्याचा निर्णय

देशाच्या फाळणीनंतर पाकिस्तानातून भारतात आलेल्या निर्वासित नागरिकांना राज्यात देण्यात आलेल्या जमिनी व मालमत्ता हस्तांतरण व वापर यावरील निर्बंधातून मुक्त करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने आज घेतला. अशा निर्वासित नागरिकांना देण्यात आलेल्या भूखंडांच्या नोंदणीवर अ-१ सत्ता प्रकार अथवा भोगवटादार वर्ग-१ अशी नोंद करण्यात येणार आहे.

देशाच्या फाळणीनंतर तत्कालीन पश्चिम पाकिस्तानातून भारतात मोठ्या प्रमाणात निर्वासित आले. राज्यात एकूण ३० ठिकाणी अशा निर्वासितांच्या वसाहती उभारण्यात आलेल्या आहेत. फाळणीच्या वेळी पाकिस्तानात स्थलांतरित झालेल्या व्यक्तींनी भारतात सोडलेली मालमत्ता आणि राज्य व केंद्र शासनाने त्यात घातलेली भर यातून मालमत्तांचा भरपाई संकोष (Compensation pool) तयार करण्यात आला. या संकोष मालमत्तेमधून १९५४ च्या पुनर्वसन अधिनियमाच्या आधारे निर्वासित व्यक्तींना जमिनी-मालमत्ता वाटप करण्यात आल्या होत्या. अशा जमिनींची अनेक ठिकाणी भोगवटादार वर्ग-२ अथवा ब/ब-१/ब-२ सत्ता प्रकार अशा नोंदी अधिकार अभिलेखात घेण्यात आलेल्या आहेत. अशा नोंदींचे सर्वेक्षण करून भरपाई संकोष मालमत्तेतून भोगवटादार वर्ग-२ अथवा ब/ब-१/ब-२ सत्ता प्रकाराने असे भूखंड दिल्याचे आढळल्यास त्यांचे सक्षम प्राधिकाऱ्याकडून पुनर्विलोकन करण्यात येणार आहे. त्यानंतर अशा निवासी मिळकतीस अ-१ सत्ता प्रकार अथवा भोगवटादार वर्ग-१ हा धारणाधिकार नमूद करण्याची कार्यवाही करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. त्यामुळे अशा जमिनी यापुढे हस्तांतरण व वापर यावरील निर्बंधातून मुक्त होणार आहेत आणि संबंधित जमीन धारकास अशा जमिनीच्या हस्तांतरण, तारण आणि वापरातील बदल किंवा पुनर्विकास यासाठी कोणत्याही पूर्व परवानगीची आवश्यकता राहणार नाही.

-----o-----

**राज्य कामगार विमा सोसायटी स्थापन करणार**

राज्यातील कामगारांना अतिविशिष्ट वैद्यकीय उपचारांसह आधुनिक वैद्यकीय सुविधा सुलभतेने व परिणामकारकरित्या पुरविण्यासाठी राज्य कामगार विमा सोसायटीची स्थापना करण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

राज्यातील कामगारांच्या आरोग्य सुरक्षेच्यादृष्टीने केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील राज्य कामगार विमा महामंडळ यांच्याकडून राज्य कामगार विमा योजना राज्यातील एकूण २२ जिल्ह्यांमध्ये ४३ लाख ५८ हजार ९९० नोंदणीकृत कामगारांसाठी राबविण्यात येते. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून कॅश बेनिफिट, प्रशासन व अतिविशिष्ट वैद्यकीय सुविधांवर खर्च करण्यात येत असला तरी प्रायमरी व सेकंडरी वैद्यकीय सुविधांच्या नियोजनाची जबाबदारी सर्वस्वी राज्य शासनाची आहे. या सुविधा ५२ राज्य कामगार विमा योजना सेवा दवाखाने, ६१० विमा वैद्यकीय व्यवसायी आणि ११ राज्य कामगार विमा योजना रुग्णांलयामार्फत राज्यात कामगारांना पुरवल्या जातात.

या सोसायटीची स्थापना झाल्यामुळे महत्त्वाचे निर्णय जलदगतीने घेणे शक्य होईल. याशिवाय कामगारांना वैद्यकीय सुविधा अधिक सुलभतेने पुरविणे शासनास शक्य होणार आहे. तसेच केंद्र शासनांतर्गत असलेल्या राज्य कामगार विमा महामंडळाकडून दरवर्षी देण्यात येणारा सुमारे १२००-१३०० कोटी रूपयांचा निधी सोसायटीत जमा होणार असल्याने रुग्णालय तसेच निवासी इमारतींची दुरुस्ती-देखभाल, आधुनिक वैद्यकीय उपचार आणि उपकरणांची उपलब्धता या रुग्णांलयामध्ये होऊ शकेल. याशिवाय डायलिसिस, रेडीओ डायग्नोस्टीक्स, कॅथ लॅब, कॅन्सरवरील उपचार यासह आयसीयु व एनआयसी युनिटसची सुविधा या दवाखान्यांमध्ये करणे शक्य होणार आहे. या सोसायटीचे नाव महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी असे असून ही सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट-१८६० अंतर्गत स्थापन करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत या कायद्यांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित राष्ट्रीय आरोग्य अभियान सोसायटी, एडस् कंट्रोल सोसायटी, आयुष, राज्य आरोग्य हमी या सोसायटया कार्यरत आहेत. या सोसायटीच्या स्थापनेसंदर्भातील मार्गदर्शक सूचना मागील वर्षी डिसेंबरमध्ये तसेच २०१८ मध्ये जानेवारीत नवी दिल्ली येथे झालेल्या राज्य कामगार विमा महामंडळाच्या बैठकीदरम्यान देण्यात आल्या होत्या. त्यामुळे यापूर्वी १३ मे २०१६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेला राज्यस्तरीय राज्य कामगार विमा महामंडळाची स्थापना करण्याचा निर्णय रद्द करून महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी स्थापन करण्याचा निर्णय आज घेण्यात आला.

-----०-----

## वन विभागातील रोजंदारीवरील ५६९ मजुरांना नियमित करणार

वन विभागात विविध कामांवर असणाऱ्या आणि ऑक्टोबर २०१२ च्या शासन निर्णयानुसार पात्र ठरणाऱ्या ५६९ रोजंदारी मजुरांना नियमित करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

वन विभागात वन्यजीव व्यवस्थापन, रोपे निर्मिती, रोपवाटिका, रस्त्यांची कामे, वन संरक्षण आदी कामांवर रोजंदारीने मजूर नेमले जातात. अनेक ठिकाणी नियमित पदे उपलब्ध नसल्याने रोजंदारी स्वरुपाच्या मजुरांकडून कामे पार पाडली जातात. विविध २२ प्रकारच्या कामांसाठी अशा प्रकारच्या मजुरांची आवश्यकता भासते. वन विभागाच्या या कामांवर प्रदीर्घ सेवा करणाऱ्या आणि ज्यांच्या सेवेची आवश्यकता आहे अशा रोजंदारी मजुरांचा कायम करण्याबाबत विचार करण्यात आला आहे. वन विभागात योजनेंतर्गत अथवा योजनेतर योजनेमध्ये १ नोव्हेंबर १९८९ ते ३१ ऑक्टोबर १९९४ या कालावधीत सलग अथवा खंडित स्वरुपात प्रतिवर्षी किमान २४० दिवस या प्रमाणे किमान पाच वर्षे काम केलेल्या ८ हजार ३९ रोजंदारी मजुरांना जानेवारी १९९६ च्या शासन निर्णयानुसार १ नोव्हेंबर १९९४ पासून शासन सेवेत नियमित करण्यात आले. त्यानंतर पुन्हा मार्च १९९८ मध्ये झालेल्या निर्णयानुसार १६१९ व जानेवारी २००० च्या निर्णयानुसार ६०७ मजुरांना शासकीय सेवेत सामावण्यात आले. अशा पद्धतीने एकूण १० हजार २६४ अधिसंख्य वनमजूर पदांवर रोजंदारी मजूर सामावले गेले.

याशिवाय ऑक्टोबर २०१२ च्या शासन निर्णयानुसार ६ हजार ५४६ मजूर निकषास पात्र ठरल्याने १ जून २०१२ पासून शासन सेवेत अधिसंख्य वन मजूर पदावर कायम करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, याच शासन निर्णयानुसार आणखी काही रोजंदारी मजूर पात्र ठरत असल्याचे आढळून आल्याने याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार या शासन निर्णयातील निकषांनुसार पात्र ठरणाऱ्या आणि वन विभागातील योजना अथवा योजनेतर निधीतून वेतन मिळणाऱ्या ५६९ रोजंदारी मजुरांना कायम करण्याचा निर्णय आज घेण्यात आला.

-----०-----

## बिरसा मुंडा आदिवासी सूतगिरणीची
## शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड

यवतमाळ जिल्ह्यातील देवधर (ता. राळेगाव) येथील बिरसा मुंडा आदिवासी सहकारी सूतगिरणीची शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

राज्याचे नवीन वस्त्रोद्योग धोरण २०१८-२०२३ नुसार सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणाऱ्या सूतगिरण्यांसाठी शासकीय भागभांडवल मंजूर करण्यात येते. जेथे कापूस तेथे कापड निर्मिती या धोरणानुसार जळगाव, यवतमाळ, औरंगाबाद, जालना, परभणी, बुलडाणा, नांदेड, अमरावती व बीड या कापूस उत्पादन करणाऱ्या जिल्ह्यातील सूतगिरण्या शासकीय अर्थसहाय्यासाठी निवडण्यात येत आहेत. संबंधित तालुक्यात उत्पादित होणाऱ्या कापसापैकी ५० टक्क्यांपेक्षा कमी कापूस सूतगिरण्यांसाठी वापरला जाणाऱ्या तालुक्यांमधील सूतगिरण्यांनाच अर्थसहाय्य करण्यात येते. या निकषानुसार देवधरच्या सूतगिरणीची अर्थसहाय्यासाठी निवड करण्यात आली आहे.आदिवासी प्रवर्गातील सहकारी सूत गिरणी म्हणून नोंदणी झालेल्या मात्र यापूर्वी अर्थसहाय्यासाठी निवड न झालेल्या सहकारी सूत गिरण्यांपैकी बिरसा मुंडा या सूतगिरणीचा समावेश बाराव्या पंचवार्षिक योजनेत करून तिला १०:३०:६० या आकृतीबंधाप्रमाणे अर्थसहाय्य दिले जाणार आहे. या सूतगिरणीला शासनाच्या अटी व शर्तींचे पालन करावे लागणार असून प्रत्येक टप्प्यावर आवश्यक असणाऱ्या सर्व मंजुऱ्या किंवा मान्यता घेणे बंधनकारक राहील. सहकारी सूतगिरणीच्या कार्यक्षेत्रात वाढ करावयाची झाल्यास सूतगिरणीला स्थलांतर करता येणार नाही. तसेच सध्या अस्तित्वात असणाऱ्या आणि नव्याने वाढणाऱ्या कार्यक्षेत्रातील सर्व सभासदांचे आधारकार्ड सूतगिरणीच्या सभासदत्वाशी जोडणे बंधनकारक राहील.

-----०-----